# जिल्हा परिषद, अमरावती
## वित्त विभाग

मुख्य लेखा व वित्त अधिकारी कार्यालय कॅम्प रोड, कोर्ट समोर अमरावती

ई-मेल-cafozpamravati@gmail.com दुरध्वनी क्र.०७२१-२६६२९३७


जाक्र/जिप/वित्त/रोखपाल/ १६०४ /२०२६ दिनांक :- ०८/०५/२०२६

प्रति,

शाखा व्यवस्थापक

----------------------------------,अमरावती

**विषय :- मुदत ठेवीचे व्याजदर कळविण्याबाबत.**

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय दि.१३ ऑगस्ट २०२०

२. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय दि.१६ जानेवारी २०२५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, जिल्हा परिषद अमरावतीला खालील कालावधी करीता रु.१० कोटी , रु.२० कोटी व रु.३० कोटी ची मुदत ठेवीमध्ये गुंतवणुक करावयाची आहे. सदर गुंतवणुक ही Callable Term Deposits करावयाची आहे. जिल्हा परिषदेचे शिल्लक निधीमधुन गुंतवणुक करण्याकरीता आपल्या बँकेचे व्याजदर या कार्यालयास दिनांक १२/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत खालील दिलेल्या तक्त्यात कार्यालयीन वेळेत बंद लिफाफामध्ये प्रत्यक्ष आणुन देण्यात यावे.

| | रुपये | कालावधी | | |
|---|---|---|---|---|
| | | ९० दिवस | १८० दिवस | ३६५ दिवस |
| १ | १० कोटी | | | |
| २ | २० कोटी | | | |
| ३ | ३० कोटी | | | |

**अटी व शर्ती :-**

१. गुंतवणुक ही उपरोक्त दिवसाकरीता करण्यात येत असुन त्यापुर्वी निधीची आवश्यकता पडल्यास व त्यामुळे मुदतठेव परत लागल्यास वरील गुंतवणुक दराने व्याज देणे बंधनकारक राहील.

२. मुदत संपल्यावर देखील सदर रक्कम या कार्यालयाचे पुढील निर्देश प्राप्त होईपर्यंत सदर रकमेवर नमुद दराने व्याज द्यावे लागेल.

३. सदर गुंतवणुक ज्या शाखेला मिळेल त्या शाखेत एकरकमी करण्यात यावी. इतर कोणत्याही शाखेत गुंतवणुक रकमेचे विभाजन करण्यात येऊ नये.

४. सदर गुंतवणुक करण्यात आलेल्या निधीबाबत मुदतपुर्तीनंतर वरील अटी व शर्तीव्यतिरिक्त कोणतेही निर्णय बँकेस या कार्यालयाचे संमतीशिवाय घेण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

५. सदर गुंतवणुक शासकिय असल्याने गुंतवणुकीवरील कोणतेही आयकर अथवा कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये.

६. रु.४ हजार कोटीपेक्षा जास्त निव्वळ संपत्ती असलेली बँक असावी तसेच उपरोक्त पत्रात नमुद करावे.

७. बँकेवर रिझर्व बँकेकडुन कोणतेही आर्थिक निर्बंध नसावेत.
८. R.B.I. ने सुचविलेले कोणतेही सुधारणात्मक कार्यवाही नसावी.
९. Callable Term Deposits चे दरपत्रकात तक्त्यात द्यावेत इतर दर देऊ नयेत.
१०. ज्या बँकेकडुन जिल्हा परिषदेला मोठया प्रमाणात CSR दिला जाईल त्या बँकेचा गुंतवणुकरीता प्राधान्याने विचार करण्यात येईल.
११. बँकेने या कार्यालयास कळविलेले व्याजदर कुठल्याही परिस्थितीमध्ये बँकेकडुन कमी करता येणार नाही.
१२. संदर्भिय शासन निर्णयात नमुद बँकांचे दरच स्विकारले जातील / ग्राहय धरल्या जातील.

( शिल्पा रा.पवार )
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद,अमरावती**

**प्रतिलीपी :-**

१. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहितीस सविनय सादर.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद,अमरावती**